एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम, महाराष्ट्र
सार्वजनिक आरोग्य विभाग

नवीन करोना विषाणू (कोविड -१९) - सद्य:स्थिती आणि उपाय योजना

दिनांक १८ एप्रिल २०२०

प्रेस नोट

**थोडक्यात महत्वाचे -**

- आज आणखी ३४ जण रुग्णालयातून घरी , आजपर्यंत एकूण ३६५ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी
- आज राज्यात ३२८ नवीन रुग्णांचे निदान
- आज राज्यात ११ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू
- राज्यातील एकूण रुग्ण ३६४८

**करोना बाधित रुग्ण**

आज राज्यात ३२८ नवीन रुग्णांची नोंद झाली. यामुळे राज्यातील करोना बाधित रुग्णांची संख्या ३६४८ झाली आहे. राज्यातील जिल्हा आणि मनपानिहाय रुग्णांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे –

| अ.क्र | जिल्हा महानगरपालिका | बाधित रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगरपालिका | २२६८ | १२६ |
| २ | ठाणे | १८ | २ |
| ३ | ठाणे मनपा | ११६ | २ |
| ४ | नवी मुंबई मनपा | ६५ | ३ |
| ५ | कल्याण डोंबवली मनपा | ७३ | २ |
| ६ | उल्हासनगर मनपा | १ | ० |
| ७ | भिवंडी निजामपूर मनपा | ४ | ० |
| ८ | मीरा भाईंदर मनपा | ६४ | २ |
| ९ | पालघर | २१ | १ |
| १० | वसई विरार मनपा | ६२ | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | रायगड | १३ | ० |
| १२ | पनवेल मनपा | २९ | १ |
| | ठाणे मंडळ एकूण | २७३४ | १४२ |
| १३ | नाशिक | ३ | ० |
| १४ | नाशिक मनपा | ५ | ० |
| १५ | मालेगाव मनपा | ४५ | २ |
| १६ | अहमदनगर | १९ | १ |
| १७ | अहमदनगर मनपा | ९ | ० |
| १८ | धुळे | १ | १ |
| १९ | धुळे मनपा | ० | ० |
| २० | जळगाव | ० | ० |
| २१ | जळगाव मनपा | २ | १ |
| २२ | नंदूरबार | १ | ० |
| | नाशिक मंडळ एकूण | ८५ | ५ |
| २३ | पुणे | १८ | १ |
| २४ | पुणे मनपा | ५२८ | ४९ |
| २५ | पिंपरी चिंचवड मनपा | ४५ | १ |
| २६ | सोलापूर | ० | ० |
| २७ | सोलापूर मनपा | १४ | १ |
| २८ | सातारा | ११ | २ |
| | पुणे मंडळ एकूण | ६१६ | ५४ |
| २९ | कोल्हापूर | २ | ० |
| ३० | कोल्हापूर मनपा | ३ | ० |
| ३१ | सांगली | २६ | ० |
| ३२ | सांगली मिरज कुपवाड मनपा | ० | ० |
| ३३ | सिंधुदुर्ग | १ | ० |
| ३४ | रत्नागिरी | ६ | १ |
| | कोल्हापूर मंडळ एकूण | ३८ | १ |
| ३५ | औरंगाबाद | ० | ० |
| ३६ | औरंगाबाद मनपा | २९ | ३ |
| ३७ | जालना | २ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | हिंगोली | १ | ० |
| ३९ | परभणी | ० | ० |
| ४० | परभणी मनपा | १ | ० |
| | औरंगाबाद मंडळ एकूण | ३३ | ३ |
| ४१ | लातूर | ८ | ० |
| ४२ | लातूर मनपा | ० | ० |
| ४३ | उस्मानाबाद | ३ | ० |
| ४४ | बीड | १ | ० |
| ४५ | नांदेड | ० | ० |
| ४६ | नांदेड मनपा | ० | ० |
| | लातूर मंडळ एकूण | १२ | ० |
| ४७ | अकोला | ७ | १ |
| ४८ | अकोला मनपा | ८ | ० |
| ४९ | अमरावती | ० | ० |
| ५० | अमरावती मनपा | ६ | १ |
| ५१ | यवतमाळ | १३ | ० |
| ५२ | बुलढाणा | २१ | १ |
| ५३ | वाशिम | १ | ० |
| | अकोला मंडळ एकूण | ५६ | ३ |
| ५४ | नागपूर | २ | ० |
| ५५ | नागपूर मनपा | ५८ | १ |
| ५६ | वर्धा | ० | ० |
| ५७ | भंडारा | ० | ० |
| ५८ | गोंदिया | १ | ० |
| ५९ | चंद्रपूर | ० | ० |
| ६० | चंद्रपूर मनपा | २ | ० |
| ६१ | गडचिरोली | ० | ० |
| | नागपूर एकूण | ६३ | १ |
| | इतर राज्ये | ११ | २ |
| | एकूण | ३६४८ | २११* |

( टीप – या तक्त्यातील रुग्ण संख्या  रुग्णाने दिलेल्या पत्यानुसार आहे. काही रुग्णांचे प्रत्यक्ष वास्तव्य वेगळीकडे असू शकते. जिल्हा / मनपांनी उपलब्ध करुन दिलेल्या पत्त्यानुसार रुग्णसंख्येत बदल झालेला आहे. चंद्रपूर मनपातील रुग्ण हे परदेशात  संसर्गग्रस्त  झालेले आहेत. )

**मृत्यू –**

आज राज्यात ११ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आज झालेल्या मृत्यूपैकी मुंबई  येथील ५ आणि पुणे येथील ४  तर १ मृत्यू औरंगाबाद मनपा आणि १ मृत्यू ठाणे मनपा येथील आहे.

**मृत्यूंबद्दल अधिकची माहिती –**

आज झालेल्या मृत्यूंपैकी  ६ पुरुष तर ५  महिला आहेत. आज झालेल्या ११  मृत्यूपैकी ६० वर्षे किंवा त्यावरील  ५ रुग्ण आहेत तर ६  रुग्ण हे वय वर्षे ४० ते ६० या वयोगटातील आहेत.  मृत्यूमुखी पडलेल्या ११ जणांपैकी ९ रुग्णांमध्ये ( ८२ %)  मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग अशा स्वरुपाचे अतिजोखमीचे आजार आढळले आहेत. कोविड १९ मुळे राज्यात झालेल्या मृत्यूंची संख्या आता २११* झाली आहे. ( ** या पूर्वी ११ एप्रिल रोजी कळवलेला एक मृत्यू कोविड१९ निगेटिव्ह असल्याचे मुंबई मनपाने कळवल्याने सदर मृत्यू एकूण मृत्यूमधून वगळण्यात आला आहे.* )

**प्रयोगशाळा तपासण्या –**

आजपर्यंत पाठविण्यात आलेल्या ६७,४६८ नमुन्यांपैकी ६३,४७६ जणांचे प्रयोगशाळा नमुने करोना करता निगेटिव्ह आले आहेत तर ३६४८ जण पॉझिटिव्ह आले आहेत.

**क्लस्टर कंटेनमेंट कृतियोजना –**

राज्यातील ज्या भागात रुग्णांचे क्लस्टर सापडले आहेत त्या ठिकाणी केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार क्लस्टर कंटेनमेंट कृतियोजना अंमलात आणण्यात येत आहे. राज्यात सध्या ३४४ कंटेनमेंट झोन क्रियाशील असून आज एकूण ५९९४  सर्वेक्षण पथकांनी  काम केले असून त्यांनी २३ लाखाहून अधिक लोकसंख्येचे सर्वेक्षण केलेले आहे.

**इतर महत्वाचे मुद्दे -**

१. आजपर्यंत राज्यातून ३६५ कोविड१९ रुग्णांना ते बरे झाल्यानंतर घरी सोडण्यात आले आहे.

२. सध्या राज्यात ८२,२९९ लोक होम क्वारंटाईनमध्ये असून ६९९९ लोक संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

| **हा अहवाल १८ एप्रिल २०२० च्या अद्ययावत आकडेवारीवरुन तयार करण्यात आलेला आहे.** | |
|---|---|
| राज्य नियंत्रण कक्ष | ०२०/२६१२७३९४ टोल फ्री क्रमांक १०४ |